लोकमत

# शांती निकेतन, निर्मल स्कूलला जेतेपद

## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा : १७ वर्ष गटात सेंट्रल स्कूल, स्कॉटिश अकॅडमी विजयी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाचोरा :** सीबीएसई दिल्लीने आयोजित केलेल्या आंतरशालेय राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत १९ वर्षे मुलांच्या गटात शांती निकेतन, कोल्हापूर आणि मुलींच्या गटात यजमान निर्मल स्कूलच्या संघाने विजेतेपद पटकावले. तर १७ वर्षे आतील मुलांच्या गटात नागपूरच्या सेंट्रल स्कूलने आणि मुलींच्या गटात परभणीच्या स्कॉटिस अकॅडमीने विजय मिळवला आहे.

या स्पर्धेचा समारोप पाचोरा येथे रविवारी झाला. १९ वर्षे आतील मुलींच्या गटात पाचोरा येथील निर्मल स्कूलने अव्वल स्थान मिळवले. दत्तकला शिक्षण संस्था, दौंडने दुसरे तर जिंदाल विद्यामंदिर, ठाणेने तिसरे स्थान पटकावले.



**१९ वर्षे आतील मुलींच्या गटात सुरु असलेला अंतिम सामना**

१९ वर्षे आतील मुलांच्या अंतिम सामन्यात शांती निकेतनने जिंदाल स्कूलवर ४९-३५ असा विजय मिळवला.

१७ वर्षे मुलांच्या गटात सेंट्रल पब्लिक स्कूलने यजमान निर्मल स्कूलच्या संघाला ६१-२९ असे पराभूत केले.

१७ वर्षे आतील मुलींच्या गटात स्कॉटिश अकॅडमीने ऑलसेंट्स स्कूल, भिवंडीचा ४६-१२ असा पराभव केला. व्यकंटेश स्कूल सांगली संघाने तिसरे स्थान मिळवले.

विजयी खेळाडूंचे कौतुक निर्मल इंटरनॅशनल स्कूलच्या अध्यक्षा वैशाली सूर्यवंशी, प्राचार्य डॉ.भगवान सावंत, सचिव नरेंद्रसिंह सूर्यवंशी, कबड्डी संघटनेचे बाबासाहेब उलपे, जिल्हा कबड्डी संघटनेचे सचिव नितीन बरडे यांनी कौतुक केले.